# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

**MID-TERM EXAMINATION 2024-25**

**MARATHI**

Class : IX | Duration : **3** Hrs
Date : 23.09.2024 | Max. Marks : **80**
Admission No.: | Roll No.:

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

(1) सूचनेप्रमाणे आकलनकृती व भाषाभ्यास यांमधील आकृत्या काढाव्यात.
(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ गुण (40)

**प्र 1 :– (आकलन ) अः अपठित गद्यांश** **(1X5=5)**

भारतदेश हा पृथ्वीचा मुकुटूणी आहे. त्यामध्ये संपत्तीचे विपुल भंडार आहे. सगळे महत्त्वाचे धातू भारतात सापडतात. गंगा,यमुना,कृष्णा,गोदावरी,कावेरी आणि नर्मदा आपल्या अमृत जलाने त्याच्या भूमीचे सिंचन करतात. येथील कसलेल्या जमिनित सदैव सोने पिकते.ऋतूंचे चक्र सदैव मनाला आकृष्ट करते. भारतभूमीच्या आकर्षणाने विदेशी लोक नेहमीच आकर्षित होतात. अनेक विदेशी लोकांनी येथे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने येऊन ज्ञान आणि वैभव प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला. अनेक महापुरुषांनी येथे जन्म घेऊन मानवतेचा बोध केला रामाची मर्यादाशीलता,कृष्णाचा कर्मयोग ,गौतमाची अहिंसा,युधिष्ठिराचा धर्म,कर्णाची दानशूरता,अर्जुनाचे युध्दकौशल्य आणि महावीराची करुणा ही जीवनचरित्रयाच्या आदर्शाची अनुपम उदाहरणे आहेत. भारताचा इतिहास गौरवाच्या सर्वोच्च शिखरावर पोहचलेला होता. नालंदा आणि तक्षशिला यांसारखी विदयापीठे ज्ञान आणि विज्ञानाच्या अध्ययनाची अद्भूत केंद्रे होती. पाणिनीसारखे व्याकरण आणि चाणक्यसारखे अर्थशास्त्रज्ञ व राजकारणपटू तक्षशीला विदयापीठाचेच अध्यापक होते .जगातील प्राचीन ग्रथ,उपनिषधे,वेद आणि गीता यांची निर्मिती भारतामध्येच झाली.व्यास ,भवभूती,कालिदास,तुकाराम,तुलसीदास यांसारख्या प्रतिभावंतांनी आपल्या काव्यवैभवाने जगाला विस्मित केले.

1 पृथ्वीचा मुकुटमणी कोण आहे ?

**अ** धातू **ब** भारत देश **क** अद्भूतकेंद्र **ड** विज्ञान

2 आपल्या अमृत जलाने कोण भूमीचे सिंचन करतात ?

**अ** गंगा,यमुना **ब** कृष्णा,गोदावरी **क** कावेरी,नर्मदा **ड** वरील पैकी सर्व

3 भारतभूमीच्या आकर्षणाने कोण आकर्षित होतात?

**अ** प्रतिभावंत **ब** देशवासीय **क** जनता **ड** विदेशी लोकं

4 भारत देशात जन्म घेऊन कोणी मानवतेचा बोध केला आहे ?

**अ** महापुरुषांनी **ब** देवांनी **क** लोकांनी **ड** असुरांनी

5 कोणती विदयापीठे ज्ञान आणि विज्ञानाच्या अध्यनाची अद्‌भुत केंद्रे होती ?

**अ** पुणे विद्‌यापीठ **ब** नालंदा **क** नालंदा व तक्षशिला **ड** कलकत्ता

**प्र 1:– (आकलन ) आः अपठित गद्‌यांश (1X5=5)**

संयम राखणे हा एक सद्‌गुण आहे. काया ,वाचा ,मनावर संयम राखणे ही आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची व आवश्यक गोष्ट आहे. जीवनाचा ख–या अर्थाने आनंद घ्यायचा असेल, तर संयम हा गुण आपल्या अंगी असायला हवा . मनावर संयम ठेवायचा असेल तर चांगले ऐकणे , चांगले बोलणे, चांगले पाहणे, चांगल्या विचारांच्या व सज्जन माणसांच्या संगतीत राहणे हे उपाय करायला हवेत. मनामधील वाईट, नकारात्मक विचारांची साफसफाई करून मनाला रोज चांगल्या विचारांचे स्नान घडवायला हवे. आपल्या इच्छा वाढल्या , की त्या पूर्ण करण्याच्या नादात जीवन जगायचे सोडून देतो.जीवनाचा आनंद घेणे विसरून जातो. असे न घडण्यासाठी इच्छांच्या मागे न पळणे व मनाला संयम धरायला शिकवणे गरजेचे आहे.

कृती 1 आकलन :– आकृतीबंध पूर्ण करा

1 या गोष्टींवर संयम राखणे आवश्यक आहे:–

1————————— 2 ————————— 3 —————————

2 मनावर संयम बाळगण्याचे उपाय –

1————————— 2 ————————— 3 —————————

3 मनाला याचे स्नान घडवायला हवे :– ——————————————————

4 मनातील या विचारांची साफसफाई करायला हवी –

1————————— 2 —————————

5 इच्छा वाढल्या की काय होते ?

6 संयम राखणे हा एक काय आहे ?

**प्र 3 शब्दांच्या जाती ओळखा ( कोणतेही चार) (4X1=4)**

1 <u>**दारासमोर**</u> गाडी उभी आहे. ( अधोरेखित शब्दाची जात ओळखा )

अ शब्दयोगी अव्यय ब केवलप्रयोगी अव्यय

क विशेषण ड सर्वनाम

2 दिल्ली <u>**आणि**</u> मुंबई ही दोन मोठी शहरे आहेत ( अधोरेखित शब्दाची जात ओळखा )

अ विशेषण ब अलंकार

क उभयान्वयी अव्यय ड क्रियाविशेषण

3 बापरे ! केवढा मोठा हा अपघात. ( केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

अ केवढा ब अपघात

क मोठा ड बापरे

4 सविताने काल रात्री खूप अभ्यास केला. ( क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

अ काल ब खूप

क अभ्यास ड रात्री

5 लालभडक गुलाबाची फुले बागेत फुलली आहेत.( विशेषण ओळखा)

**प्र 4 काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1. शिवाजी न्यायप्रिय राजा होता. ( काळ ओळखा )
2. हे जग वेगाने पुढे जात आहे. ( काळ ओळखा)
3. काल बाबा शाळेत आले होते . ( भविष्यकाळ करा )

4. मी अभ्यास करीत आहे. (भूतकाळ करा)

**प्र 5 वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 शाब्बास खूप छान खेळलास !

2 मुलांनी नियमित अभ्यास करायला नको का ?

3 सर्वांनी दररोज व्यायाम करा

4 मी दररोज खेळ खेळतो .

**प्र 6 समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 विदयालय 2 इभ्रत 3 खेद

**प्र 7 विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 अल्पकाळ 2 सभ्य 3 अधोगती

**प्र 8 लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 बैल 2 साधू 3 बहीण

**प्र 9 वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** तिकिट 2 ध्वज 3 गाणे

**प्र 10 समास ओळखा ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** रामलक्ष्मण 2 पंचवटी 3 प्रतिवर्ष

**प्र 11 पाठ्पुस्तक गदय** **(1X5=5)**

शिरीष कार्यक्रम करण्यात मुरलेल्या एखादया वादकाप्रमाणे वाजवत होता. इतके शिकला तरी कुठे याचाच मी विचार करत होतो. आणि त्याहीपेक्षा मला मुख्य प्रश्न असा पडला होता, की नवीनच शिकायला लागलेला मुलगा इतके उत्कुष्ट वाजवतो तर जुने मुरलेले विदयार्थी किती छान वाजवत असतील असेच बाहेरचे लोक म्हणत असणार, तेव्हा याच्यानंतर वाजवायला कुणाला बसवावे ? टाळयांच्या कडकडाटाने मी भनावर आलो . शिरीष आत आला त्याने माइया पायावर डोके ठेवले मी त्याला उठवत विचारले ,शिरीष हा काय प्रकार आह`? तू माइयाकडे न येता आणखी कुठे शिकत होता ?

**प्रश्न :–** कोणतेही पाच

1 शिरीषने कोणाच्या पायावर डोके ठेवले ?

2 मुरलेल्या वादकाप्रमाणे कोण वाजवत होते ?

3 लेखकाला कोणता प्रश्न पडला ?

4 कशाचा कडकडात झाला ?

5 शेवटी लेखकाने मुलाला काय विचारले ?

6 नवीनच शिकायला आलेला मुलगा कसे वाजवत होता ?

**प्र 12 पुढील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :–** **(5X1=5)**

संतकृपा झालीं । इमारत फळा आली।।1।।
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।।2।।
नामा तयाचा किंकर। तेणें रचिले हे आवार ।।3।।
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।4।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।5।।

**कृती 1:** ( आकलन )

(1) शब्दजाल पूर्ण कराः
कवितेत आलेल्या चार संताची नावे लिहा :—

**कृती (2)** योग्य पर्याय निवडा :

(1) फळा येणे – ——————

(1) फळ लागणे (2) बहर येणे (3) सफल होणे

**कृती 3** पुढील संतांची कामगिरी लिहा :—

(1) संत ज्ञानेश्वर

(2) संत तुकाराम

**विभाग —ब —40 गुण**

**प्र 1 साहित्य गद्य**

**प्र 1 अ) एका वाक्यात उत्तरे लिहा:— ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 शिरीषने कोणत्या रागातील गत वाजवायला सुरूवात केली ?

2 लेखकाला शिरीषला कार्यक्रम का दयायचा नव्हता ?

3 रेल्वे साठी प्रथम उठाव कोणी केला ?

4 ऑलिपिक सामने दर किती वर्षांनी होतात ?

5 कशातून दिव्याच्या शोधाची बातमी जगभर पसरली ?

**प्र 1 ब ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :—( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 भारतााात सर्वांत पहिली रेल्वे ————— येथून सुटली .

2 रेल्वेकडे लोंकांना आकर्षित करण्यासाठी ——————ठेवले.

3 भारताने ———स्पर्धेत अनेक वर्षे अजिंक्यपद टिकवले.

4 प्लेटिनमचा प्रयोग ————होता.

5 फसलेल्या प्रयोगातूनही नंतर प्रयोग करणा—यांचे ————वाचतात .

**प्र 1 क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा:— ( कोणतेही एक )** **(1X3=3)**

1 तुम्हांला समजलेल्या सखू आजीचे व्यक्तिचित्र रेखाटा ?

2 संशोधक होण्यासाठी तुम्ही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात कसे बदल कराल ते लिहा ?

3 ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व ही संकल्पना स्पष्ट करा ?

**प्र 2 पद्य ( कविता वरील प्रश्न )**

**प्र 2 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा :— ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 संतकृपा झाली अभंग कोणी लिहिला आहे ?

2 संतकृपा झाली अभंगाचा क्रमांक काय आहे ?

3 वारकरी संप्रदायरूपी इमारतीचा पाया कोणी रचला ?

4 व्यायामाने अंगामध्ये काय वाढते ?

5 आरोग्यदायी मित्र कोण आहे ?

**प्र 2 ब ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :—( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 इमारत ———— आली.

2 ——————तयाचा किंकर.

3 बहिणी म्हणे फडकती —————

4 ————— वैरी मानिला सर्वत्र । सर्वतोपरी ।।.

5 व्यायामे ------ जाई दूरी .

**प्र 2 क) पुढील कवितेच्या दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती करा** **(1X3=3)**

कविता – व्यायामाचे महत्त्व

(1) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री

(2) प्रस्तुत कवितेचा विषय

(3) प्रस्तुत कवितेतील पुढील दोन ओळींचा अर्थ –

व्यायामे वाढे प्रतिकार शक्ति। स्वावलंबनाची प्रवृत्ति
व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति । कार्य करण्याची ।।

(4) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश –

**प्र 3 स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही दोन )** **(2X1=2)**

1 काझीरंगाची भूमी कशी आहे ?

2 काझीरंगा अभयारण्य कोठे आहे ?

3 जंगलात फिरण्यासाठी असलेल्या हत्तीनीचे नाव काय होते ?

**लेखन**

**प्र 4 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X8=8)**

**1 पुस्तकाचे आत्मवृत्त**

मुद्दे:– जन्म --- मैत्री ---- उपयोग ---- बदलते स्वरूप ----आनंद ---- खंत.

**2 झाडे लावा,झाडे जगवा**

पर्यावरणाचा –हास ------ झांडाचे उपयोग----उपाययोजना----वृक्षतोड –दुष्परिणाम

**3 आमची अविस्मरणीय सहल**

सहलीचे ठिकाण -------- स्थान वैशिष्टये --------ठिकाणाचे चित्रण ------ अविस्मरणीय असण्याचे कारण -------- समारोप.

**प्र 5 मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)** **(1X7=7)**

कोल्हा व करकोचा यांची मैत्री --- कोल्हाचे मित्राला जेवायला बोलविणे --- उथळ थाळीत खीर करकोच्याला खीर खाता येईना --- करकोचा उपाशी ---- करकोच्याचे कोल्हाला बोलविणे --- सुरईत खीर --- कोल्हा उपाशी---तात्पर्य.

**किंवा**

एक सैनिक---- लढाईत शत्रूच्या हाती--- अनेक दिवस शत्रूच्या कैदेत--- युद्ध थांबल्यावर सुटका--- घरी परतणे--- रस्त्यावर पक्षी विकणारा--- पिंज–यातील पक्ष्यांना पाहणे --- सर्व पक्षी विकत घेणे --- सोडून देणे --'– तात्पर्य .

**प्र 6 पत्र लेखन :– ( कोणतेही एक )** **(1X5=5)**

तुमच्या शाळेतील ग्रंथलयासाठी काही पुस्तके मागवणारे पत्र खेळाचे साहित्य विकणा–या दुकानासाठी लिहा –

**किंवा**

नव्या पादचारी पुलावर फेरी– वाल्यांनी अतिक्रमण केल्याने विदयार्थांची गैरसोय होत असल्याबद्दल तक्रार करणारे पत्र महानगरपालिकेला लिहा :–

**:::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::**